SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

बुधवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२४

अधिसूचना

क्रमांक : १३४/२०२४ दिनांक : १६/१०/२०२४

विषय :- नवीन महाविद्यालयाचे प्रथम संलग्नीकरणाबाबत..

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नवीन महाविद्यालये सुरु करण्यास शासन निर्णयात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन सत्र २०२४-२५ पासून कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्या परिषदेच्या दि.०३.१०.२०२४ (दि.३०.०८.२०२४, ०३.०९.२०२४ व २५.०९.२०२४ ची तहकुब सभा) च्या सभेत विषय क्र. ५८, ६९ व ७४ अन्वये मान्य केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नवीन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन व विद्यापीठ अनुदान आयोगाचे Regulation - 2009 मधील परिच्छेद ४ नुसार तात्पुरते (Temporary) प्रथम संलग्नीकरण प्रदान करण्यात येत आहे

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच शासन निर्णयातील नमुद केलेल्या क्र. ५ ते ११ वरील अटींची पुर्तता संस्थेने/महाविद्यालयाने करावी, सदर अटींची पुर्तता न केल्यास पुढील सत्राकरीता संलग्नीकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ. क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक	विद्याशाखा / अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्नीकरण कालावधी	शासन निर्णय क्रमांक व दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळ, आसलगांव ता.जळगांव (जामोद) जि.बुलडाणा.	लिलाबाई तुळशिरामजी ढोकणे वरिष्ठ महाविद्यालय,आसलगांव ता.जळगांव (जामोद) बुलडाणा (१०२०)	बी.ए.भाग-१ Compulsory (इंग्रजी,मराठी,हिंदी, इतिहास, राज्यशास्त्र,अर्थशास्त्र, समाजशास्त्र, भूगोल) बी.कॉम.भाग-१ (अभ्यासक्रमिकेप्रमाणे) बी.एस्सी.भाग-१ Compulsory (इंग्रजी,मराठी,हिंदी, रसायनशास्त्र,वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र,भौतिकशास्त्र,गणित)	१२० १२० १२०	सत्र २०२४-२५	क्र.HTED-२९०६६ ११)/१२/२०२४/८११२ १२-MHT-(HE-4), दि.१५/०७/२०२४

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.